International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.8
Volume 5, Issue 3, Jul-Sep 2025 ID: IJCRTA0000206 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# राष्ट्रीय आरोग्य धोरण 2017 ची 2047 च्या विकसित भारत संकल्पनेतील भूमिका : एक अवलोकन

**प्रा. डॉ. प्रभाकर जाधव**

**Author Affiliation:**
सहयोगी प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद जि. नांदेड.
ईमेल: prabhakarjadhav70@gmail.com

**Citation of Article:** जाधव, पी. (2025). राष्ट्रीय आरोग्य धोरण 2017 ची 2047 च्या विकसित भारत संकल्पनेतील भूमिका : एक अवलोकन. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583- 1801, 5 (3), pg. 80-83. ijcrta.org

**DOI: 10.5281/zenodo.17168664**

**सारांश (Abstract):**

*देशातील सार्वजनिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी भारत सरकारने 2017 साली राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ (NHP २०१७) धोरण लागू केले.ज्याचा उद्देश सर्व नागरिकांना परवडणारी, सर्वसमावेशक आणि दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करणे आहे. हे धोरण २०४७ पर्यंत विकसित भारत (Viksit Bharat) बनवण्याच्या दृष्टिकोनात मध्यवर्ती भूमिका बजावणारे आहे. कारण निरोगी समाज हा आर्थिक आणि सामाजिक प्रगतीचा पाया आहे. या गृहीतकाच्या उद्देशातून सदरील संशोधन पेपरमध्ये NHP २०१७ च्या वैशिष्ट्यांचा, प्रगतीचा, आव्हानांचा आढावा घेतला असून, २०४७ साठी त्याचे महत्त्व आणि सुधारणा याबाबत सविस्तर चर्चा केली आहे. हे विश्लेषण विविध संशोधन स्रोतांवर आधारित आहे, ज्यात NITI Aayog चे दस्तऐवज, सरकारने केलेले विविध अभ्यास अहवाल आणि सरकारच्या वेळोवेळी घेतलेल्या धोरणाचा आधार घेण्यात आलेला आहे.*

## प्रस्तावना (Introduction):

भारताने १५ मार्च २०१७ रोजी राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ स्वीकारले आहे. ज्यामुळे देशातील आरोग्य क्षेत्रातील खर्च ha GDP च्या २.५% पर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे धोरण अल्माटा घोषणेच्या (१९७८) प्राथमिक आरोग्य सेवांच्या तत्त्वांवर आधारित आहे. त्याचबरोबर या धोरणाला SDGs (Sustainable Development Goals) शी जोडलेले आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पात आरोग्य क्षेत्र अधिक विकसित करायचे आहे. तर त्यासाठी भारताची अर्थव्यवस्था ही जवळपास USD ३०-४० ट्रिलियन पर्यंत पोहोचली पाहिजे.विकसित भारताच्या सक्षमतेसाठी या अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट निश्चित होणे आवश्यक आहे. ज्यात प्रति व्यक्ति उत्पन्न USD १५,०००-१८,००० पर्यंत पोहोचवणे समाविष्ट पाहिजे.. NITI Aayog च्या 'स्वस्थ भारत, विकसित भारत' दृष्टिकोनानुसार, आरोग्य प्रणालीची मजबुतीकरण ही २०४७ च्या स्वप्नाची गुरुकिल्ली आहे.

## राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ ची प्रमुख वैशिष्ट्ये:

राष्ट्रीय आरोग्य धोरण (National Health Policy) म्हणजे भारत सरकारने देशातील आरोग्य सेवांचे नियोजन, विकास आणि अंमलबजावणीसाठी तयार केलेले मार्गदर्शक तत्त्वांचे दस्तऐवज आहे. हे धोरण आरोग्य क्षेत्रातील आव्हाने सोडवण्यासाठी, सर्व नागरिकांना दर्जेदार आणि परवडणारी आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आणि एकूणच आरोग्य यंत्रणा मजबूत करण्यासाठी केलेले धोरण आहे. भारताचे नवीनतम आरोग्य धोरण आहे, जे 1983 आणि 2002 च्या धोरणांचा पाठपुरावा करते. याचे मुख्य उद्दिष्ट "सर्वांसाठी आरोग्य" (Health for All) साध्य करणे आहे

सर्वसमावेशक आरोग्य सेवा उपलब्ध करून देऊन सर्व नागरिकांना, विशेषतः गरीब आणि वंचितांना, आर्थिक अडचणींशिवाय आरोग्य सेवा उपलब्ध करणे.ही लोक कल्याणकारी सरकारचे प्रमुख दायित्व अधिक वाढवता यावे.तसेच आजही अनेक आजरांचे निवारण होऊ शकले नाही. अशा आजारासाठी प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा उभारून रोगांचे प्रतिबंध करण्याबरोबर प्राथमिक उपचार आणि रोगनिदान यावर लक्ष केंद्रित करणे. नागरिकांना चांगल्या आरोग्य सेवेची हमी देण्यासाठी आयुष्मान भारत योजना सुरू करावी आणि त्या अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PM-JAY) आणि हेल्थ अँड वेलनेस सेंटर्स यांचा समावेश केला पाहिजे. ज्यामुळे गंभीर आजारांवर उपचार आणि प्राथमिक आरोग्य सेवा सुधारल्या जातील. आरोग्य क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे रुग्णांना डिजिटल हेल्थ मिशनद्वारे रुग्ण माहितीचे डिजिटलायझेशन आणि टेलिमेडिसिनला वाढवण्याबाबत प्रोत्साहन दिले पाहिजे.

राष्ट्रीय आरोग्य धोरणाबाबतची सर्वसमावेशकता लक्षात घेता या धोरणाची उद्दिष्टे ही सर्वच प्रकारच्या प्राथमिक, माध्यमिक आणि तृतीयक आरोग्य सेवांचा विस्तार वाढवणे. त्या अंतर्गत माता आणि बालमृत्यू दर कमी करणे. संक्रामक आणि असंक्रामक रोगांवर नियंत्रण आणणे.आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आणि संख्या वाढवणे.स्वच्छता आणि निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देणे यासाठी आवश्यक असलेली भूमिका स्पष्ट करणे. ही भूमिका स्पष्ट करत असताना सार्वजनिक आणि खासगी क्षेत्राच्या सहकार्याने आरोग्य सुविधांचा विकास करणे.आरोग्य सेवांमुळे होणारा आर्थिक बोजा कमी करणे,ग्रामीण आणि शहरी भागातील आरोग्य असमानता कमी करणे.

राष्ट्रीय आरोग्य धोरण 2017 हे भारताला सर्वसमावेशक आणि कार्यक्षम आरोग्य यंत्रणा प्रदान करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे, ज्यामुळे प्रत्येक नागरिकाला निरोगी जीवन जगण्याची संधी मिळेल. भारत सरकारने 2017 मध्ये देशाच्या सार्वजनिक विकासातील राष्ट्रीय आरोग्य धोरण घोषित केले आहे. यामध्ये विशेषत्वाने सर्वसमावेशकता असली पाहिजे. देशातील लिंग, जात आणि भौगोलिक असमानता कमी करता यावी. ममर च्या अहवालानुसार देशातील जन्म मृत्यू दर हे प्रति लक्ष लोकसंख्येमागे १०० च्या वर आह. सर्वसामान्य लोकांचे आयुर्मान घटले आहे. देशातील आरोग्य क्षेत्राच्या माध्यमातून प्रतिबंधात्मक सेवांचा विस्तार करता यावा. मोठ्या प्रमाणात प्राथमिक आरोग्य सेवा केंद्राची उभारणी करता यावी. सामान्य जनतेला आरोग्य क्षेत्राच्या सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात. सामान्य जनतेचा आरोग्यावर होणारा जो खर्च आहे तो 65 टक्क्यावरून पन्नास टक्क्यावर आणला पाहिजे. त्यासाठी सरकारने डिजिटल हेल्थ, टेलिमेडिसिन आणि डिजिटल रेकॉर्ड्स, राष्ट्रीय डिजिटल हेल्थ मिशन |अशा योजनाना AYUSH धोरणांशी जोडून या भारतीय राष्ट्रीय आरोग्य धोरणाला मुख्य प्रवाहात आणले तरच. या धोरणाचे अधिक जलद गतीने एकीकरण होईल.

त्यामुळे कायद्याच्या अंमलबजावणीस प्रोत्साहन देता येईल. एका अभ्यासानुसार सरकारची NHP २०१७ याबाबत असलेली दूरदृष्टी ही SDGs शी अधिक सुसंगत आहे.तसेच भारतात असे काही अनेज आजार आहेत. ते

अद्यापही नियंत्रणात नाहीत. त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान आणि अन्य सुविधा उपलब्ध झाल्या तर हे धोरण भारताच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

2017 साली राष्ट्रीय आरोग्य धोरण घोषित झाले. त्याची अंमलबजावणी सुरु झाली. त्यानंतर या धोरणाची सध्याची प्रगती (२०२५ पर्यंत) सुद्धा लक्षात घेणे गरजेचे आहे. या राष्ट्रीय आरोग्य धोरणाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून चालू करण्यात आलेल्या आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आजपर्यंत ५० कोटी लोकांना लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच देशातील सार्वजनिक आरोग्य सेवेच्या माध्यमातून ५ कोटी रुग्णांना मोफत उपचार दिला गेला आहे.जण आरोग्य सुविधा अधिक विकेंद्रीकृत व्हावी यासाठी देशात २७,००० एक्षा अधिक हेल्थ अँड वेलनेस सेंटर्स कार्यरत आहेत. तसेच NFHS-5 (२०१९-२१) नुसार देशभरातील रोग निर्देशांक निर्देशित करण्यात आलेला आहे. 2020 मध्ये देशात आलेल्या कोरोना या महारोगाच्या संक्रमणाने पूर्ण जगात भागाकार माजला होता त्यावर उपाय म्हणून भारताने सर्वसमावेशक लस तयार केले. देशातील नव्हे तर जगातील 230 करोड कोविड-१९ लसीकरणाने डोस देण्यात आले.

तसेच आरोग्य क्षेत्रात डिजिटल साधनांच्या माध्यमातून लाखो लोकांना हेल्थ ID तयार करून देण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर टेलिमेडिसिन विस्तार अधिक झपाट्याने वाढवण्यात आलेला आहे. देशातील सामान्य जनतेचे आरोग्य अधिक सुरक्षित असले पाहिजे यासाठी सरकारने स्वच्छता म्हणून माहिती घेतली आहे. अधिक प्रभावीपणे राबवत राहावे म्हणून स्वच्छ भारत मिशन या नावाने कार्यरत आहे. 2025 च्या आकडेवारीनुसार या विषयांच्या अंतर्गत ११ कोटी शौचालये बांधण्यात आल्यामुळे भारत हागणदारीमुक्त (२०१९) झाला आहे. एक अभ्यासानुसार राष्ट्रीय आरोग्य धोरण 2017 च्या FYPs (Five-Year Plans) पंचवार्षिक योजना आणि NITI Aayog च्या ३-वर्षीय अजेंडाशी सुसंगतता बरीचशी मिळतीजुळती आहे. ज्यामुळे भारतातील आरोग्य क्षेत्राचे बजेट वाढले.

२०४७ च्या विकसित भारतासाठी राष्ट्रीय आरोग्य धोरण 2017 ची भूमिका अधिक महत्वपूर्ण असणार आहे. विकसित भारत २०४७ च्या दृष्टिकोनातुन निती आयोगाने आपले वार्षिक अहवाल सादर करत असताना त्यामध्ये स्पष्ट उल्लेख केला आहे की राष्ट्राच्या एकूण खर्चापैकी आरोग्य क्षेत्रावर कोणाला खर्च समाधानकारक होत नाही. देशातील आरोग्य क्षेत्रावर जर GDP च्या ३-४% पर्यंत खर्च झाला तर देशातील नागरिकांचे आयुर्मान ७५-८० वर्षे असे वाढण्यात मदत होईल. देशातील नागरिकांचे आयुष्यमान वाढले पाहिजे, कुपोषण निर्मूलन झाले पाहिजे. संक्रमण तालीम रोगावर नियंत्रण ठेवता आले पाहिजे. आयुर्वेद आणि योगाच्या माध्यमातून भारताने जगाचे नेतृत्व केले पाहिजे. तसेच निरोगी अर्थव्यवस्थेचे संचालन भारताकडून व्हावे. याबाबतची शिफारस NHP २०१७ च्या धोरणात करण्यात आलेली आहे. एक संशोधनानुसार, NHP २०१७ SDG ३ (आरोग्य आणि कल्याण) साकारण्यासाठी मार्गदर्शक आहे, जे विकसित भारताच्या SDGs २०३० शी जोडलेले आहे.

राष्ट्रीय आरोग्य धरण 2025 पुढे आजही मोठी आव्हाने आहेत. पहिले आव्हान आहे आर्थिक धोरणाबाबतचे भारत सरकारच्या एकूण जीडीपीच्या खर्चापैकी केवळ आरोग्य क्षेत्रावर १.५-२%. एवढाच खर्च आज पर्यंत झालेला आहे. राष्ट्रीय आरोग्य धोरणाच्या परिपूर्तीसाठी आवश्यक असलेली व्यवस्था निर्माण करायची असेल तर या आरोग्य क्षेत्रासाठी अधिक स्वरूपाच्या आर्थिक तरतुदी करणे अभिप्रेत आहे. सार्वजनिक आरोग्य क्षेत्राच्या संदर्भात ज्या काही सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. त्यामध्ये आधी पायाभूत सुधारणांचा खूप मोठा अभाव आहे. सामाजिक विकास आणि लोक कल्याण विकास या संदर्भातून आरोग्य सेवा लोकांना उपलब्ध झाली पाहिजे.त्याबाबत आजही

Volume 5, Issue 3, Jul-Sep 2025 ID: IJCRTA0000206 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

भारत खूप पाठीमागे आहे. आरोग्य संघटनेच्या निर्देशानुसार आजही जगामध्ये एक हजार रुग्णा पाठीमागे एक डॉक्टर असेच प्रमाण असल्याचे दिसून येते. भारतात हे प्रमाण कमी आहे. भारतामध्ये जवळपास दीड हजार रुग्णाच्या पाठीमागे एक डॉक्टर असे हे रुग्ण डॉक्टर गुणोत्तराचे प्रमाण आहे.तसेच याबाबत शहरी आणि ग्रामीण, सरकारी आणि व्यावसायिक असे प्रमाण शोधले तर आपले डॉक्टर यांच्या गुणोत्तरांमध्ये खूप मोठी तफावत आहे. एवढेच नव्हे तर भारतामध्ये जन आरोग्य सुविधा आणि रुग्ण हक्काबाबत प्रमाणात जागरूकता निर्माण केली पाहिजे. नागरिकांच्या रुग्णहक्कावर अधिक मोठ्या प्रमाणात काम उभा करण्याची गरज आह

**निष्कर्ष:**

भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्ताने 2047 च्या विकसित भारताचा संकल्पित आराखडा तयार केलेला आहे. हा आराखडा पूर्णता मानव विकास निर्देशांक यासाठी लागणारे जे निकष आहेत. अशा निकषाच्या विविध आधारावर विकसित भारताचा संकल्पित आराखडा तयार करण्यात येत आहे. त्यामध्ये सार्वजनिक आरोग्य क्षेत्राची सर्वात महत्त्वाची भूमिका असणार आहे. 2017 स*** भारत सरकारने जे राष्ट्रीय आरोग्य धोरण जाहीर केले आहे हे धोरण एक प्रकारे 2047 च्या विकसित भारताचा पाया आहे. जर या धोरणाची यथायोग्य अंमलबजावणी करत असताना तंत्रज्ञान, गुंतवणूक आणि सामुदायिक सहभाग वाढवून निरोगी भारत आणि समृद्ध भारत बनले तर "स्वस्थ भारत हाच विकसित भारत" ही संकल्पना साकारण्यासाठी एकत्रित प्रयत्न आवश्यक आहेत.

**संदर्भ:**

1. Lahiri, A. (2018). India’s National Health Policy 2017 and 2030 Agenda for Sustainable Development. ResearchGate.
2. Kumar, S. (2018). National Health Policy 2017: An Overview. ResearchGate.
3. Singh, R. (2020). National Health Policies in Practice: An Explorative Analysis for India. ResearchGate.
4. Gupta, P. (2019). Digital health in India – As envisaged by the National Health Policy (2017). ResearchGate.
5. Dehury, R. K., et al. (2023). Can the National Health Policy 2017 Strengthen the National Health System? SAGE Journals.
6. NITI Aayog. (2024). Vision for Viksit Bharat@2047: An Approach Paper.
7. Bora, A., & Rawat, D. M. (2025). India’s Path to Viksit Bharat@2047 through SDG 2030. SSRN.
8. Paul, V. K. (2024). Swasth Bharat, Viksit Bharat: India's 2047 Dream Hinges on Healthcare. Elets eHealth.
9. Sharma, R. (2024). VISION FOR VIKSIT BHARAT@2047: AN APPROACH. ResearchGate.